शुक्रवार
मुंबई चौफेर
पाने 24 • किंमत ₹ 4
वर्ष २६ • अंक १८९ • मुंबई • शुक्रवार, ८ नोव्हेंबर २०१९ • www.mumbaichoufer.com

# चित्रांचे प्रदर्शन



प्रसिद्ध चित्रकार रिचा अग्रवाल यांच्या चित्रांचे प्रदर्शन ९ नोव्हेंबरपासून वांद्रे येथील बॉम्बे आर्ट सोसायटी, के. सी. मार्ग, बांद्रा (प.), मुंबई ४०००५० येथे भरणार आहे. पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनाचा अनुभव रिचा यांनी चित्रकलाकृतीतून रेखाटला आहे. ९ ते ११ नोव्हेंबरदरम्यान स. ११ ते सायं. ७ पर्यंत ही चित्रे कलारसिकांना विनामूल्य पाहता येतील. यानिमित्ताने समता आर्ट इनिशिएटिव्ह हा नवीन उपक्रमही सुरू करण्यात येणार आहे.

आदिवासी जीवनाबद्दल आपण नेहमीच ऐकत किंवा वाचत असतो, मात्र ते जवळून अनुभवण्याची संधी प्रत्येकवेळी मिळतेच असे नाही. मुंबईच्या जवळच असलेला पालघर जिल्हा. यात प्रामुख्याने आदिवासी जीवन दिसते. या आदिवासी जीवनाचे चित्रण रिचा यांनी केले आहे.

पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागात रिचा यांनी भेट दिली. तेथील स्थानिक महिलांशी संवाद साधला. रोजच्या जगण्यात संघर्ष असूनही आनंदी राहणाऱ्या या महिलांनी रिचा यांना प्रभावित केले. तेथून प्रेरणा घेऊन परतलेल्या रिचा यांनी आपल्या भावना थेट कॅन्व्हासवर उतरवल्या. याच चित्रमालिकेचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. एक कलाकार, एक माणूस म्हणून त्यांना तेथे जो अनुभव आला आहे, तोच आपल्याला दिसतो. यासाठी रिचा यांनी अॅक्रेलिकचा वापर केला आहे. अॅक्रेलिक लवकर सुकते, तसेच जलरंगाचा परिणाम देते आणि तैलरंगासारखी गूढता देते.

पालघरमधील जीवनाचा अनुभव घेतलेल्या रिचा यांनी समता आर्ट इनिशिएटिव्ह हा एक नवीन प्लॅटफॉर्म सुरू केला आहे. पालघर तालुक्यातील आदिवासी कलाकारांसाठी हा उपक्रम आहे.

त्यांना रोजगार मिळवून देण्याबरोबरच चित्रकलेचे योग्य ते शिक्षण मिळावे हा यामागचा हेतू आहे.

आपल्या या प्रदर्शनाबद्दल रिचा सांगतात की, हे पालघरमधील आदिवासी मुली आणि महिलांचे नैसर्गिक चित्रण आहे. त्या जशा मला भेटल्या तशा त्या तुमच्यासमोर मांडल्या आहेत. यातील प्रत्येक चित्र हा माझ्या भावनांचा खराखुरा आविष्कार आहे. पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनाचा अनुभव रिचा यांनी चित्रकलाकृतीतून रेखाटला आहे. ९ ते ११ नोव्हेंबरदरम्यान स. ११ ते सायं. ७ पर्यंत ही चित्रे कलारसिकांना विनामूल्य पाहता येतील.